चुकण ही प्रकृती, मान्य करण ही संस्कृतीआणि सुधारणा करण ही प्रगती आहे

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २० जुले २०२५ | अंक २११० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

All TOURS घर से घर तक
SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
दिल से दिल तक TIME IN TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

पंढरपुरात चंद्रभागा नदीत बुडून तीन भाविकांचा मृत्यू

पंढरपुरात विठुरायाच्या दर्शनासाठी रोज हजारो भाविक येतात. अनेक भाविक दर्शनापूर्वी चंद्रभागा नदीत जाऊन स्नान करतात. चंद्रभागा नदीत उजनी धरणातून पाणी सोडले आहे. यामुळे नदीच्या पात्रात पाणी मोठ्या प्रमाणावर आहे. नदीच्या पात्रात स्नानासाठी गेलेल्या तीन महिला भाविकांचा शनिवारी सकाळी बुडून मृत्यू झाला आहे. त्यातील दोन महिलांचे मृतदेह सापडले आहेत. तिसऱ्या महिलेचा शोध सुरू आहे. उजनी धरणातून सोडलेल्या पाण्यामुळे सध्या चंद्रभागा नदी दुथडी भरून वाहत आहे. भाविकांना पाण्याचा अंदाज न आल्याने ही घटना घडली आहे.

पाण्याचा अंदाज न आल्याने घडली घटना

विठ्ठल दर्शनासाठी आलेल्या तीन महिला भाविक शनिवारी सकाळी चंद्रभागेत स्नानासाठी उतरल्या होत्या. जालना जिल्ह्यातील भोकरदान येथे राहणाऱ्या दोन महिला आणि एक अनोळखी महिला नदीत उतरली. त्या महिलांना पाण्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे चंद्रभागेत त्या बुडाल्या. पुंडलिक मंदिराजवळ ही घटना घडली. त्या महिला पाण्यात बुडत असल्याचे इतर महिलांच्या लक्षात आले. त्यामुळे मदतीसाठी आरडा ओरड सुरु केली.

*** ********** *********

पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयात गुणवंतांचा सत्कार व सरपंच गहीनाथ पाखरे यांचा वाढदिवस साजरा

शिरूर कासार ।प्रतिनिधी आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित पाडळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळी तालुका शिरूर कासार येथे दहावी व बारावी परीक्षेत प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सरपंच गहीनाथ पाखरे यांचा वाढदिवस असा संयुक्त कार्यक्रम १९ रोजी मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती व संस्थेच्या संस्थापिका केशरकाकु क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य अंगदराव दहिकळे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य अंगदराव दहिफळे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच गहिनाथ पाखरे, उपसरपंच रामकिसन इंगळे, माजी सरपंच रामदास हांगे, चेअरमन भगवान पाखरे, ग्रा प सदस्य मच्छिंद्र मिसाळ, अशोक इंगळे, प्रकाश इंगळे,ऋषी राऊत, शिवराज कंठाळे,संभाजी पाखरे, बाळासाहेब मिसाळ आदींची उपस्थित होती.या कार्यक्रमांमध्ये दहावी व बारावी परीक्षेमध्ये प्रथम व्दितीय व

तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा व पालकांचा अध्यक्ष व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तसेच सरपंच गहीनाथ पाखरे यांचा वाढदिवस साजरा करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमांमध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सरपंच पाखरे यांनी वाढदिवसा निमित्त वॉटर बॅग, पेन व खाऊ वाटप केला. कार्यक्रम प्रसंगी सरपंच गहिनाथ पाखरे चेअरमन भगवान पाखरे माजी सरपंच रामदास हंगे अशोक इंगळे प्राचार्य अंगदराव दहिफळे आदींनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक दीपक रत्नपारखी यांनी केले. तर सूत्रसंचलन रजनी इंगोले यांनी केले. आणि आभार मारुती धांडे यांनी मानले.या कार्यक्रमास प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घरकुलसाठी पात्र लाभार्थींनी सेल्फ सर्व्हे करून घ्यावा–आ.संदीप क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून त्याकरिता ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करण्यासाठी ३१ जुलै ही अंतिम मुदतवाढ मिळाली आहे. ३१ जुलै पर्यंत नागरिकांना मोबाईल पद्वारे सेल्फ सर्व्हे करता येणार आहे. त्यामुळे बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यातील ज्या नागरिकांचे सेल्फ सर्व्हे करणे बाकी आहे अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे

किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत ३१ जुलै पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सध्या सद्या सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी/ ग्रामसेवक यांचे मार्फत किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकता. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करून घ्यावी, नोंदणी करण्यासाठी अंतिम मुदतवाढ मिळालेली आहे.

किसनराव कुकडे यांचा सेवापुर्ती सोहळा मोठ्या थाटात संपन्न

प्रतिनिधी रामेश्वर तांगडे/आज दिनांक १८/७/२०२५ रोजी जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ परतुर संस्थेचे उपाध्यक्ष कपिल भैया आकात यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री शिवाजी विद्यालय जांब समर्थ येथे सेवानिवृत्त शिक्षक श्री किसनराव कुकडे सर आणि त्यांच्या अर्धांगिनी सौ. जयश्री ताई कुकडे आणि श्री शिवाजीराव आवचार यांच्या अर्धांगिनी सौ. पुष्पाताई आवचार सहपरिवार सेवा गौरव समारंभ कार्यक्रमाचे आयोजन केले होते त्यानिमित्ताने कपिल भैया आकात यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जांब समर्थ येथील प्रतिष्ठित नागरिक प्रकाश अण्णा तांगडे, गावचे प्रथम नागरिक सरपंच बाळासाहेब तांगडे, तसेच रामेश्वर तांगडे, परमेश्वर बाराहाते, ह भ प पांडुरंग महाराज आनंदे मजी प्राचार्य

लालबहादूर शास्त्री विद्यालय आष्टी श्री तुकाराम भिसे सर सेवानिवृत्त मुख्याध्यापक भारत भुंबर सर तसेच शिवाजी विद्यालय येथील सेवानिवृत्त लिपिक बाबासाहेब बापू तांगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षक किसनराव कुकडे यांच्या विषय अनेकांनी भाषण केले. त्यांच्या जीवना विषय माहिती सांगण्यात अली.तसेच श्री शिवाजी विद्यालय जांब समर्थ येथील मुख्याध्यापक गणेशराव झरेकर सर तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमांमध्ये भाग घेतला तसेच जाम समर्थ येथील समस्त ग्रामस्थ आणि पंच कृषी तील समस्त ग्रामस्थांनी भाग घेतला कार्यक्रम मोठ्या आनंदात आणि थाटामाटा संपन्न झाला

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त मंगळवारी जिल्हाभर रक्तदान शिबिराचे आयोजन - शंकर देशमुख

अजय सावंत (बीड प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व राज्याच्या पर्यावरण पशुसंवर्धन व हवामान बदल मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असून दिनांक 22 रोजी बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी कार्यालय चाणक्यपुरी नाट्यगृह रोड येथे सकाळी १० ते सायं ४ वा. रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या रक्तदान शिबिरात मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांनी केले आहे . राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा दिनांक 22 जुलै रोजी वाढदिवस असून बीड जिल्ह्याच्या नेत्या व राज्याच्या पर्यावरण पशुसंवर्धन आणि हवामान बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस 26 जुलै रोजी

आहे. भारतीय जनता पार्टीच्या या दोन्ही नेत्यांच्या वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीने ठरवले असून त्यानिमित्त जिल्हाभर रक्तदान शिबिराचे आयोजन केलेले असून जिल्ह्यातील सर्व मंडळात व तालुक्यात मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे .या रक्तदान शिबिरात सर्वांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे व रक्तदान करावे अशा प्रकारचे आवाहन जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे.

५२ ग्रामपंचायत सरपंच पदाची आरक्षण सोडत जाहिर !

सव्वीस ग्रामपंचायत सरपंच खुर्चिवर महिलांचा अधिकार ! मानूर येथे सर्वसाधारण महिला होणार सरपंचपदी विराजमान मानूर (प्रतिनिधी) शिरूर कासार तालुक्यातील बावन्न ग्रामपंचायत मधे २०२५ ते २०३० या पंचवार्षीकसाठी सरपंच पदाची आरक्षण सोडत मंगळवारी तहसिल कार्यालयात तहसिलदार सुरेश घोळवे यांचे प्रमुख मार्गदर्शनाखाली चिठ्ठ्याद्वारे जाहिर झाली यात अर्ध्या म्हणजे सव्वीस ग्रामपंचायतच्या खुर्चिवर महिला सरपंच म्हणून अधिकार गाजवणार असल्याचे जाहिर झाले . मंगळवारी ही आरक्षण सोडत प्रक्रिया नियोजीत वेळी सुरू झाली ,कशा पध्दतीने आरक्षण याबाबत सविस्तर तहसिलदार सुरेश घोळवे यांनी उपस्थित नागरिकांना समजावून सांगितले त्यानंतर नियमाप्रमाणे महिला त्यात अनुसूचित जाती जमाती नंतर नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण महिला सरपंच आरक्षण जाहिर केले ,एका लहाण मुलीच्या हस्ते चिठ्या काढून सोडत जाहीर केली गेली .अनुसूचित जाती महिलासाठी ! बोरगांव च.व उकिरडा च. या दोन ग्रामपंचायत . नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला ! वडळी मदमापुरी ,खालापुरी ,शिरापुर धु. ,खोकरमोह ,झापेवाडी ,ब्र .यळंब , पिंपळनेर या ग्रामपंचायत . राळेसांगवी , रायमोह ,शिरापुर गात ,हिवरसिंगा ,तरडगव्हण ,दहिवंडी ,राक्षसभुवन ,पाडळी ,खांबा लिंबा ,गोमळवाडा ,तिंतरवणी ,मानुर , तागडगांव ,हाटकरवाडी आव्हळवाडी ,सांगळवाडी डोळेवाडी ,कान्होबाची वाडी ,आणि भानकवाडी या ग्रामपंचायतचा समावेश आहे .उर्वरीत सव्वीस ग्रामपंचायत या सर्वसाधारण म्हणून सुटल्या आहेत

सर्व दिव्यांगांना दर्जेदार साहित्य देऊ: खा.सोनवणे अंबाजोगाईत १०१४ गरजूंचा तपासणी शिबीरात सहभाग

अंबाजोगाई: केंद्र शासनाच्या माध्यमातून दिव्यांग लोकांना आवश्यक तो लाभ मिळावा, यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करत आहे. सर्व दिव्यांगाना अतिशय उत्तम दर्जाचे साहित्य उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन खा.बजरंग सोनवणे यांनी दिले. जिल्हा समाज कल्याण विभाग बीड व एलिम्को मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यामध्ये दिव्यांगांना व जेष्ठ नागरीकांना मोफत कृत्रिम साहित्य साधने वाटप करण्याच्या अनुषंगाने दि.१९ जुलै रोजी पंचायत समिती येथे पूर्व तपासणी शिबीर संपन्न झाले. शिबीराचे उद्घाटन खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते झाले. यावेळी शिबीरात १०१४ जणांची तपासणी करण्यात आली.यावेळी माजी आ.पृथ्वीराज साठे, राजसाहेब देशमुख, डॉ.नरेंद्र काळे, माधव जाधव, तालुकाध्यक्ष अमर देशमुख, दिपक शिंदे, संजय भोसले, पिंटू ठोंबरे, अमोल चव्हाण, शरीफ सय्यद शितल लांडगे, गटविकास अधिकारी दिवाणी, तालुका वैद्यकीय अधिकारी लोमटे यांचेसह 'अलिम्को' संस्थेची संपूर्ण टीमसह उपस्थिती होती. शिबीरामध्ये दिव्यांगांना जयपुरी फुट, कृत्रिम हात, कॅलीपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, वॉकींग स्टीक, ब्रेल किट, स्मार्ट फोन, श्रवणयंत्र या सह जेष्ठ नागरीका करीता बेल्ट, वॉकर, काठया, चष्मे, कृत्रिम दात, खुबड, कृत्रिम अवयव, कानाची मशिन, व्हिलचेअर कमोडसहीत, सिलीकॉन खोम तकीया, नीब्रेस, स्पायनल सपोर्ट, सरवायकल कॉलर या सह इतर साहित्य

वाटप करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने पुर्व तपासणी शिबीर त्या-त्या तालुक्यातील पंचायतसमितीमध्ये आयोजित करण्यात येत असून दि.१९ जुलै रोजी अंबाजोगाई येथे शिबीराचे उद्घाटन खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते झाले.

अशी झाली तपासणी
मुकबधीर २२२
मतिमंद १२६
अंध १२२
अस्थिव्यंग ३७५
जेष्ठ नागरिक १७१
एकूण १०१४

आवश्यक कागदपत्रे
दिव्याग: दिव्यांग प्रमाणपत्र आणि युडीआयडी कार्ड, आधार कार्ड, वार्षीक उत्पन्नाचा दाखला/ रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे मासिक २२५०० किंवा वार्षीक २७०००० च्या आत, व जेष्ठ नागरिकांसाठी आधार कार्ड, वार्षीक उत्पन्नाचा दाखला/ रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे (मासिक १५००० किवा वार्षीक १८०००० च्या आत असावे. अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी, एस.एन.मेश्राम यांनी दिली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २० जुले २०२५
https://lokaarambh.com

संपादकीय

वृध्दाश्रम एक आधार !

आजकाल वृध्दाश्रमांमध्ये वृध्दांची वाढती संख्या ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. एकेकाळी वृध्दाश्रम हे निराधार किंवा अत्यंत गरजू वृध्दांसाठी होते, परंतु आता अनेक कुटुंबे असूनही वृध्द व्यक्तींना वृध्दाश्रमात राहावे लागत आहे. ही केवळ आकडेवारीची समस्या नसून, यामागे अनेक गुंतागुंतीची सामाजिक, आर्थिक आणि भावनिक कारणे दडलेली आहेत. वृध्दाश्रम हा आज वृध्दांसाठी एक आधार ठरत आहे. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची व्यथा :- वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांना अनेक प्रकारच्या व्यथा आणि समस्यांना सामोरे जावे लागते. कुटुंबापासून दूर राहिल्याने त्यांना अत्यंत एकटेपणा जाणवतो. नातवंडे, मुले यांच्यासोबतचे प्रेमळ क्षण गमावल्याची खंत त्यांना सतत सतावते. सण-समारंभात किंवा कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये ते कुटुंबासोबत नसतात, ज्यामुळे त्यांना खूप दुःख होते. अनेकदा वृध्दांना कुटुंबाने नाकारल्याची किंवा त्यांची उपेक्षा केल्याची भावना असते, ज्यामुळे त्यांना मानसिक त्रास होतो. काहीवेळा समाजातही त्यांना दुर्लक्षित केले जाते.

आरोग्याच्या समस्या आणि काळजीचा अभाव :- वृध्दापकाळात शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या अनेक समस्या येतात. वृध्दाश्रमांमध्ये वैद्यकीय सुविधा असल्या तरी, कुटुंबाकडून मिळणारी वैयक्तिक काळजी आणि आपुलकी त्यांना मिळत नाही. काही वृध्दाश्रमांमध्ये चांगल्या सुविधांचा अभावही असतो.

आर्थिक असुरक्षितता :- जरी काही वृध्दाश्रम विनामूल्य असले तरी, काहींमध्ये शुल्क आकारले जाते. निवृत्तीवेतन किंवा स्वतःचे उत्पन्न नसलेल्या वृध्दांसाठी हे एक आव्हान असते. मुलांना आर्थिक भार नको वाटल्यामुळेही काहीवेळा वृध्दांना वृध्दाश्रमात पाठवले जाते.

सामाजिक संबंधांचा अभाव :- जुन्या मित्रमंडळी आणि शेजाऱ्यांपासून दूर राहिल्याने त्यांचे सामाजिक जीवन संपुष्टात येते. नवीन वातावरणात जुळवून घेणे त्यांना कठीण जाते. अनेकदा त्यांना आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात एकटेपणाची आणि मृत्यूच्या भीतीची भावना येते, ज्यामुळे ते नैराश्यात जातात.

वृध्दाश्रमात वृध्दांची वाढती संख्या होण्याची प्रमुख कारणे :- पूर्वी एकत्र कुटुंब पध्दती होती, जिथे सर्व पिढ्या एकत्र राहत होत्या. आता विभक्त कुटुंब पध्दतीमुळे मुलांना आपल्या वृध्द आई-वडिलांची जबाबदारी घेणे कठीण वाटते, विशेषतः जेव्हा ते नोकरी किंवा इतर कारणांसाठी दुसऱ्या शहरात जातात. वाढत्या शहरीकरणामुळे आणि पाश्चात्त्य जीवनशैलीच्या प्रभावामुळे वृध्दाची काळजी घेण्याची जबाबदारी कमी होत चालली आहे. वैयक्तिक स्वातंत्र्य आणि करिअरला अधिक महत्त्व दिले जात आहे.

आर्थिक ताण आणि महागाई :- सध्याच्या काळात महागाई वाढल्यामुळे आणि आर्थिक ताणामुळे काही कुटुंबांना वृध्द काळजी घेणे आर्थिकदृष्ट्या अवघड वाटू शकते. स्त्रिया आता मोठ्या प्रमाणात नोकरी करत असल्यामुळे त्यांना घरकाम आणि वृध्द व्यक्तींची काळजी घेणे दोन्ही गोष्टी सांभाळणे अवघड वाटते.

वृध्दांची आजारपण आणि त्यांची काळजी घेण्याची असमर्थता :- वृध्दापकाळात अनेकदा दीर्घकाळ चालणाऱ्या व्याधी जडतात, ज्यांची काळजी घेणे घरातल्या सदस्यांसाठी अवघड होऊ शकते, विशेषतः जर त्यांना विशिष्ट वैद्यकीय देखभालीची गरज असेल. काहीवेळा मालमत्तेवरून किंवा कौटुंबिक वादामुळे वृध्द व्यक्तींना घरातून बाहेर पडून वृध्दाश्रमाचा आधार घ्यावा लागतो.

संवादाचा अभाव आणि नात्यांमधील दुरावा:- कुटुंबातील सदस्यांमध्ये संवादाचा अभाव आणि नात्यांमधील दुरावा वाढल्यामुळे वृध्द व्यक्तींना उपेक्षित झाल्यासारखे वाटते आणि ते स्वतःहून वृध्दाश्रमात जाण्याचा निर्णय घेतात. काही वेळा लग्नानंतर मुला-मुलींचा आपल्या पालकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो, ज्यामुळे कुटुंबात वृध्द व्यक्तींसाठी जागा राहत नाही.

वृध्दाश्रमांमध्ये वृध्दांची वाढती संख्या थांबवण्यासाठी आणि वृध्दांचे जीवनमान सुधारण्यासाठी खालील उपाययोजना करता येऊ शकतात :-

मुलांना लहानपणापासूनच वडीलधाऱ्यांचा आदर करण्याचे आणि त्यांची काळजी घेण्याचे संस्कार देणे आवश्यक आहे. कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकमेकांशी संवाद साधणे आणि समस्यांवर चर्चा करणे महत्त्वाचे आहे. आज मुलांनी आपल्या वृध्द पालकांसोबत वेळ घालवणे, त्यांच्या गरजा समजून घेणे आणि त्यांना भावनिक आधार देणे आवश्यक आहे.

लिंबागणेश येथे विद्युत मोटार पंप चोरांचा सुळसुळाट ; शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण; नेकनुर पोलिस प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- (दि.१९) बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात काही महिन्यांपासून छोट्या मोठ्या भुरट्या चो-या, विद्युत मोटारी चोरणे,रोहित्राचे वायर चोरी अशा घटना घडत असुन गेल्या ६ महिन्यात २२ विद्युत मोटार चोरीच्या घटना घडुन संबंधित प्रकरणी पोलिस प्रशासनाला तक्रारी करूनही पोलिस प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असुन शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे . गेल्या पंधरा दिवसात दोन वेळा विद्युत मोटार वायरच्या चोरीची घटना घडलेल्या मुळेवस्ती वरील शेतकरी रामदास मुळे यांनी विहीरीत पाणी असुन पिकांना पाणी देता येईना झाले तर जनावरांबरोबरच माणसांच्या पिण्याच्या पाण्याची अडचण असल्याची संतप्त प्रतिक्रिया दिली. याचवेळी लिंबागणेश येथील सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी ३ महिन्यांपूर्वी विद्युत मोटार,पेटी आणि वायर चोरीची घटना घडल्याची लेखी तक्रार नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी चंद्रकांत गोसावी यांना दिल्यानंतर त्यांनी फिर्याद घेतली नसुन वारंवार पाठपुरावा करूनही तपास झालाच नसल्याने नेकनुर पोलिस

स्टेशन जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला आहे. पावसाने ओढ धरल्याने दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर असतानाच शेतकरी उपयोगी साहित्य चोरीच्या वाढत्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असुन चोरट्यांवर लगाम लावण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर उपाययोजना करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

मोटार वायर चोरीमुळे विहीरीत पाणी असुन पिकांना देता येईना; माणसांबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची अडचण :- रामदास मुळे ; डिगांबर मुळे (शेतकरी)

- - -

लिंबागणेश येथील मुळे वस्तीवरील रोहित्रांवर जवळपास २० शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन असुन गेल्या १५ दिवसांत मोटार वायर चोरीच्या घटनाची हि दुसरी घटना असुन माझ्या विहिरीवरील १५०० फुट वायर, विद्युत पेटी असा एकुण ३० हजार रुपयांहून अधिक नुकसान झाले आहे. त्यामुळे याचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी रामदास मुळे, डिगांबर मुळे,सूदाम मुळे, सुभाष मुळे,रामराजे मुळे, अशोक मुळे, नवनाथ मुळे ,प्रकाश मुळे यांनी केली आहे.

नेकनुर पोलिस प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष ; सपोनी गोसावी यांनी फिर्याद सुद्धा घेतली नाही :- विक्रांत वाणी (सामाजिक कार्यकर्ते)

- - -

लिंबागणेश परीसरात गेल्या ६ महिन्यात २२ पेक्षा जास्त विद्युत मोटार पंप आणि वायर चोरीच्या घटना घडल्या आहेत. ३ महिन्यांपूर्वी माझ्या शेतातील विद्युत मोटार पंप, पेटी आणि वायर मिळुन २० हजारांचा ऐवज लंपास झाला होता. नेकनुर येथे सपोनी चंद्रकांत गोसावी यांना मोटार चोरणारांच्या टोळीची नावे सांगुनही त्यांनी माझी फिर्याद घेतली नाही.वारंवार पाठपुरावा करूनही तपासाच्या नावाखाली टोलवाटोलवी सुरू असुन नेकनुर पोलिस स्टेशनचे अधिकारी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत त्यामुळे चोरीच्या घटनात वाढ होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी केला आहे.

पोलिस प्रशासनाने चोरट्यांचा बंदोबस्त करावा :- डॉ.गणेश ढवळे

- - -

लिंबागणेश परीसरात दुबार पेरणीचे संकट उद्भवले असतानाच शेतातील पाणबुडी, विद्युत मोटारी, वायर आदी शेतकरी उपयोगी साहित्य चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांसमोर नवं संकट उभे राहिले. यामुळे शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण असुन पोलिस प्रशासनाने चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

सामान्यांचा आवाज, शेतकऱ्यांचा प्रतिनिधी डोंगरकिनी जिल्हा परिषद निवडणूकीत सरपंच आप्पासाहेब येवले नावाच्या चर्चेने विरोधकांला वाटायला लागली भिती

पाटोदा (प्रतिनिधी) डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटात सध्या एक नाव जनतेच्या चर्चेत आहे ते म्हणजे युवा सरपंच आप्पासाहेब येवले. पारंपरिक राजकारणाच्या पलीकडे जाऊन कार्याच्या बळावर जनतेच्या मनात स्थान निर्माण करणारे, शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेणारे आणि सर्व सामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे.आप्पासाहेब येवले हे मूळचे शेतकरी कुटुंबातून आलेले असून, ग्रामीण जीवनशैली, अडचणी आणि गरजा त्यांना लहानपणापासून ज्ञात आहेत. त्यांनी डोंगरकिन्ही ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावर काम करत असताना गावात पायाभूत सुविधा, स्वच्छता, जलव्यवस्थापन, महिला बचतगट सक्षमीकरण, तरुणांसाठी रोजगार व प्रशिक्षण यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात ठोस पावले उचलली. प्रामाणिकपणा, पारदर्शक कारभार आणि सर्व समावेशक निर्णयप्रक्रिया या तत्त्वांमुळे त्यांनी अल्पावधीतच लोकांचा विश्वास संपादन केला असल्यामुळे डोंगरकिन्ही परिसरात गेल्या काही वर्षांमध्ये राजकारण हे काही मोजक्या घराण्यांपुरतेच मर्यादित राहिले आहे. मात्र, सध्याच्या घडीला गावा गावातील युवक, शेतकरी, महिला आणि गोरगरिब वर्गात एक सूर उमटतोय "आता आपला माणूस जिल्हा परिषदेवर पाहिजे! या पार्श्वभूमीवर आप्पासाहेब येवले यांचं नाव केवळ चर्चेपुरतं मर्यादित न राहता, आता जनतेच्या अपेक्षांचं आणि विश्वासाचं प्रतीक बनत चाललं आहे.त्यांचं कार्य पाहता, अनेक राजकीय जाणकार देखील मान्य करतात की, या भागाला काम करणारा, बोलणारा नव्हे अशा नेतृत्वाची गरज आहे. आणि आप्पासाहेब येवले हे या सगळ्या गुणांची सांगड घालणारे व्यक्तिमत्त्व आहे.आतापर्यंत निवडणुकांमध्ये पैसा,जातीय समीकरणं आणि बाह्य प्रभाव यांचाच जोर राहिला आहे. पण आप्पासाहेब येवले यांनी या सगळ्याला फाटा देत फक्त जनतेच्या प्रेमावर आणि कामगिरीवर आपली

ओळख निर्माण केली आहे. त्यामुळेच अनेक पैशाच्या जोरावर निवडणुकीच्या तयारीत असणाऱ्या इच्छुकांना हा तरुण नेतृत्व चर्चेत येत असल्यामुळे मोठा धक्का ठरत असून आप्पासाहेब येवले हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) कार्यकर्ते असून, त्यांनी ग्रामस्तरावर पक्षाला मजबूत आधार दिला आहे. आता प्रश्न असा उपस्थित होतोय की, "राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्यांच्या या कार्याची दखल घेईल का?" स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांपासून तरूण मतदारांपर्यंत एकच मागणी ऐकू येते – "आप्पासाहेब येवले यांना जिल्हा परिषदेसाठी उमेदवारी द्यावा या गटातील अनेक ग्रामस्थांनी आपल्या प्रतिक्रिया देताना म्हटले की: गावपातळीवर ज्याने आम्हाला अडचणीच्या काळात आधार दिला, रस्ते, पाणी, शौचालय यासारख्या मूलभूत गोष्टींसाठी लढा दिला, त्यालाच आम्ही मोठ्या व्यासपीठावर पाठवणार."आप्पासाहेब येवले यांचे नाव सध्या सोशल मीडियावर, गावपातळीवरील चर्चांमध्ये आणि कार्यकर्त्यांच्या गटांमध्ये अगदी उघडपणे घेतले जात आहे. कारण राजकारणात काम करणाऱ्यांपेक्षा काम दाखवणाऱ्यांची गरज आहे. आप्पासाहेब येवले यांनी त्यांच्या कार्यातून ही पात्रता सिद्ध केलेली आहे. त्यामुळे डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटात आगामी निवडणुकीत त्यांची उमेदवारी नक्कीच चर्चेचा विषय ठरत असून, आशेचा किरण मानली जात आहे.

नाट्यश्रीच्या कविता स्पर्धांना पुन्हा सुरुवात

गडचिरोली - नाट्यश्री साहित्य कला मंच, गडचिरोलीच्या रानगर्भातील रानफुले या कवितेला वाहिलेल्या गृपवरुन सोमवार पासून राज्यस्तरीय नाट्यश्री मासिक कविता स्पर्धा ची सुरुवात करण्यात आलेली आहे .

यापुर्वीही नाट्यश्रीच्या 'रानगर्भ फुलत आहे' या गृप वरुन वर्षभर आठवडी कविता स्पर्धा घेण्यात आल्या. व त्यातील पुरस्कृत ६० कवींना नाट्यश्रीच्या वार्षिक समारंभात आठवड्याचे उत्कृष्ट कवी व त्यांच्या कवितेला उत्कृष्ट कविता म्हणून पुस्तक व आकर्षक प्रमाणपत्र देऊन मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले होते. यावेळी नाट्यश्रीने मासिक कविता स्पर्धा आयोजीत केली असून त्यात विजेत्या कवींना नाट्यश्री उत्कृष्ट कवी व कवितेला उत्कृष्ट कविता पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. यासाठी दर महिण्यात तीन उत्कृष्ट कवींची निवड करण्यात येऊन त्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून नियमित सहभागी सर्व कवींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धा विनामुल्य असून केवळ कविता संवर्धन व वाचनसंस्कृती जोपासने हा संस्थेचा उद्देश आहे. झाडीपट्टीतील कवींना विशेष प्राधान्य दिले जाईल. इच्छुक कवींनी स्पर्धेचे नियम अटी व इतर माहितीसाठी स्पर्धा प्रमुख चुडाराम बल्हारपुरे (नाटककार) व्हॉट्सॲप नंबर ९६२३६६३४३५ किंवा योगेश गोहणे (कविता विभाग प्रमुख) व्हॉट्सॲप नंबर ९४०२१२७२७३ यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
चुडाराम बल्हारपुरे (नाटककार)

आष्टी येथील पीएम श्री कन्या प्रशालेत कायदे विषयक जनजागृती शिबीर संपन्न

जिल्हा परिषद बीड ची सर्वांत जास्त पटसंख्या असलेली बीड जिल्ह्यातील एकमेव मुलींची आदर्श शाळा पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी, ता. आष्टी, जि. बीड या प्रशालेत दिवाणी न्यायालय क. स्तर आष्टी च्या तालुका विधी सेवा समिती आष्टी व वकील संघ आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. १९ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता कायदे विषयक जनजागृती शिबीर संपन्न झाले. सुरुवातीस महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले, आईसाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते पुष्प वाहून व श्रीफळ वाढवून करण्यात आले. तद्नंतर शाळेतील गीत मंचानी महाराष्ट्र गीत सादर केले. गीताला हार्मोनियम ची साथ सतिष दळवी यांनी दिली. यानंतर प्रमुख अतिथी दिवाणी न्यायाधिश क. स्तर आष्टी मा. श्री. के. के. खोमणे, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर आष्टी मा. श्रीमती पी. जी. इनामदार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर आष्टी मा. एम. आर. बडाख, आष्टी वकील संघाचे अध्यक्ष विधिज्ञ अजय जेवे, विधिज्ञ यासिर सय्यद, विधिज्ञ बाळासाहेब झांबरे, विधिज्ञ विजयकुमार शेकडे, विधिज्ञ शरद कदम, विधिज्ञ बापूराव गर्जे, विधिज्ञ बबन दाणी, विधिज्ञ गौतम निकाळजे, विधिज्ञ सतिषकुमार गायकवाड, विधिज्ञ संग्राम गळगट`, विधिज्ञ अविनाश निंबाळकर, मुख्याध्यापक आबासाहेब खताळ यांचा यथोचित सन्मान प्रशालेच्या वतिने करण्यात आला. याप्रसंगी सुरुवातीला कायद्याची तोंडओळख विधिज्ञ बापूराव गर्जे यांनी करवून दिली. त्यानंतर लहान मुलांचे कायदे विषयक अधिकार विधिज्ञ गौतम निकाळजे यांनी सांगितले. तसेच यावेळी विधिज्ञ बाळासाहेब झांबरे यांनी कायदे विषयक माहिती, बाल न्याय विषयक माहिती, कायद्याची सक्ती, विधिज्ञ सतिषकुमार गायकवाड

यांनी शिक्षण विषयक कायदा, विधिज्ञ विजयकुमार शेकडे यांनी लहान मुलांचे शिक्षण विषयक कायदे, विधिज्ञ संग्राम गळगटे यांनी बेटी बचाव, बेटी पढाव याबाबत विद्यार्थीनींना सखोल मार्गदर्शन केले. विशेष बाब म्हणजे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर आष्टी मा. श्रीमती पी. जी. इनामदार यांनी पोस्को कायदा विषयी माहिती दिली. तसेच हा कायदा गुन्हे होत असतांनाच त्यातुनच निर्माण झालेला असून सर्वांसाठी हा कायदा आहे असे सांगितले तसेच गुड टच, बड टच याबाबतीतही त्यांनी परखडपणे मत व्यक्त करुन सखोल मार्गदर्शन केले. यानंतर दिवाणी न्यायाधिश क. स्तर आष्टी मा. श्री. के. के. खोमणे यांनी नालसा बाबत सखोल मार्गदर्शन करुन मोफत विधी सेवा समिती विषयी अधिकची माहिती सांगितली. तसेच ते म्हणाले की, व्यासपीठावरुन ज्यांनी – ज्यांनी आपणांस कायद्याविषयी जी – जी माहिती सांगितली ती आपण सर्वांनी सर्वांपर्यंत पोहोच केली पाहिजे असेही शेवटी ते म्हणाले. या कायदे विषयक जनजागृती शिबीराचे बहारदार सुत्रसंचलन विधिज्ञ अविनाश निंबाळकर यांनी केले तर आभार वकील संघाचे अध्यक्ष विधिज्ञ अजय जेवे यांनी मानले. सदरील कायदे विषयक जनजागृती शिबीर यशस्वी करण्यासाठी दिवाणी न्यायालय क. स्तर आष्टी येथील कर्मचारी अशोक जाधव, बापुराव आसु`ळ व कन्या प्रशालेतील आदर्श शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २० जुले २०२५
https://lokaarambh.com

मुगाच्या दरात घसरण....

प्रजा-शासन/ किरण जैन. मानोरा : आता महिन्याभरात नवा मुग बाजारात दाखल होणार आहे,जसा मुग बाजारात दाखल होणार आहे. तसाच शेतमालाच्या दरात घसरण होत असल्याचे दिसत आहे. केंद्र शासनाच्या यंदाच्या हंगामात मुगाला प्रतिक्विंटल ८, ७८८ रुपये हमीभाव जाहीर केलेला असताना आणि यावर्षी जिल्ह्यात मुगाचा पेरा घटला असताना या दरात घसरण होत असल्याचे दिसत आहे.

किसनराव कुकडे यांचा सेवापुर्ती सोहळा मोठ्या थाटात संपन्न

प्रतिनिधी रामेश्वर तांगडे/आज दिनांक १८/७/२०२५ रोजी जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ परतुर संस्थेचे उपाध्यक्ष कपिल भैया आकात यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री शिवाजी विद्यालय जांब समर्थ येथे सेवानिवृत्त शिक्षक श्री किसनराव कुकडे सर आणि त्यांच्या अर्धांगिनी सौ. जयश्री ताई कुकडे आणि श्री शिवाजीराव आवचार यांच्या अर्धांगिनी सौ. पुष्पाताई आवचार सहपरिवार सेवा गौरव समारंभ कार्यक्रमाचे आयोजन केले होते त्यानिमित्ताने कपिल भैया आकात यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जांब समर्थ येथील प्रतिष्ठित नागरिक प्रकाश अण्णा तांगडे, गावचे प्रथम नागरिक सरपंच बाळासाहेब तांगडे, तसेच रामेश्वर तांगडे, परमेश्वर बाराहाते, ह भ प पांडुरंग महाराज आनंदे मजी प्राचार्य लालबहादूर शास्त्री विद्यालय आष्टी श्री तुकाराम भिसे सर सेवानिवृत्त मुख्याध्यापक भारत भुंबर सर तसेच शिवाजी विद्यालय येथील सेवानिवृत्त लिपिक बाबासाहेब बापू तांगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षक किसनराव कुकडे यांच्या विषय अनेकांनी भाषण केले. त्यांच्या जीवना विषय माहिती सांगण्यात अली.तसेच श्री शिवाजी विद्यालय जांब समर्थ येथील मुख्याध्यापक गणेशराव झरेकर सर तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमांमध्ये भाग घेतला तसेच जाम समर्थ येथील समस्त ग्रामस्थ आणि पंच कृषी तील समस्त ग्रामस्थांनी भाग घेतला कार्यक्रम मोठ्या आनंदात आणि थाटामाटा संपन्न झाला

ह भ प संतदास उर्फ पुरुषोत्तम महाराज हिंगणकर यांना सांस्कृतिक व साहित्य सेवारत्न पुरस्कार 2025 जाहीर

आम्ही मुंबईकर यां वृत्तपत्र संस्था आणि पत्रकार मुंबई पत्रकार संघाद्वारा ह भ प श्री संतदास उर्फ पुरुषोत्तम महाराज हिंगणकर यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक कार्य सेवेचा तसेच साहित्य सेवेचा कार्य आढावा घेऊन सांस्कृतिक व साहित्य सेवारत्न पुरस्कार २०२५ देण्याचे पत्र शनिवार दि १९/७/२०२५ रोजी प्राप्त झाले. हिंगणकर महाराज यांनी आपल्या सामाजिक कार्याचा शुभारंभ १९८७ पासून सिद्धिबेट बचाव तपोवन हटाव यां कैवल्य सम्राट संत श्री ज्ञानेश्वर महाराज यां आळंदीतील जन्मस्थान असलेलं सिद्धिबेट हे प्रायव्हेट संस्थेच्या घशातून काढून शासनाच्या ताब्यात देण्यासाठी अनेक आंदोलने आमरण उपोषण करून सुरवात करून ते आळंदीतील महाज्ञानतीर्थ असलेली इंद्रायणी स्वच्छते साठीही अनेक आंदोलन उपोषण करून शासन दरबारी निदर्शनास आणून दिले तसेच आपल्या साहित्यातून जनजागृती करीत समाज मनाला जागवलं त्यांनी अनेक कविता, अभंग लेखन करून जन जागृती केली तसेच अनेक ठिकाणी वृक्षारोपणही केलेअसे समाज हितैशी कार्य महाराष्ट्रभर आपल्या कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून आणि साहित्याच्या मंचावरून समाज जागृती केली यां बद्दल त्यांना अनेक राष्ट्रीय पुरस्कार तसेच राज्य पातळीवर ही अनेक पुरस्कार प्राप्त झालेत आज त्या कार्यात मुंबई कराचा हा सांस्कृतिक आणि साहित्य सेवारत्न पुरस्काराची आणखी भर पडली आहे पुरस्कार हे मानवाला केवळ घरात शोसाठी किंवा प्रसिद्धीसाठी नसून त्यांना कार्य करण्यास ऊर्जा प्राप्त करून देत असतात किंबहुना कार्य करण्याची जिद्द निर्माण करण्यासाठी असतात. ती कार्य चिकाटी कायम राहावी यासाठी ह्या काही संस्था त्या व्यक्तिमत्वाचा कार्य गौरव करीत असतात. महाराजांचे अभंग निर्झर भाग १, भाग २, तसेच वासुदेव पासष्टी असे तीन ग्रंथ प्रकाशित असून ऑनलाईन तसे १२४ पुस्तके आणि सर्व सोशल मीडियावर अनेक अभंग वाचायला मिळतात असे त्यांचे महाराष्ट्रात मोलाचे योगदान आहे.

पारंबी विद्यालयातील शिपाई रघुनाथ इंगळे एक हर हुन्नरी कलाकार

नवीन माध्यमिक विद्यालय पारंबी तालुका मुक्ताईनगर येथील शिपाई श्री रघुनाथ लक्ष्मण इंगळे हे गेल्या 25 वर्षापासून विद्यालयात शिपाई या पदावर कायम सेवेत आहेत शाळेचे प्रामाणिक काम करून ते पशु,पक्षी, प्राणी मित्र, सर्पमित्र म्हणून परिसरात सुप्रसिद्ध आहेत त्यांनी आत्तापर्यंत विद्यालयात व गावात सुद्धा अनेक मोठमोठी सर्प पकडून त्यांना लांब जंगलामध्ये जीवदान दिलेले आहेत मागील वर्षी विद्यालयामध्ये घुबड हा पक्षी त्यांनी पकडून विद्यार्थ्यांना त्याविषयी विशेष माहिती दिली त्याचप्रमाणे त्यांनी नुकताच धामण जातीचा सात फुटाचा सर्प पारंबी गावात पकडून विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पाहण्यासाठी त्यांनी आणला त्याप्रसंगी इयत्ता आठवी इयत्ता नववी व इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला व त्यांनी कुतूहलाने बघितला याप्रसंगी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक डॉ.शिवचरण उज्जैनकर माजी मुख्याध्यापक श्री संतोष ठाकूर सर यांनी विद्यार्थ्यांना सापाविषयी माहिती दिली या प्रसंगी श्री रघुनाथ इंगळे म्हणाले की, साप हा शेतकऱ्यांचा मित्र आहे याविषयी सुद्धा त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली तसेच ते विद्यालयातील जुने बाक,बेंचेस तुटलेली असलेत ती सुद्धा मिस्तरीची कलाकारी सर्व साहित्यांसह रघुनाथ इंगळे दुरुस्त करून ती जुनी तुटलेली बेंचेस विद्यार्थ्यांच्या उपयोगी आणण्याचं मोठं काम ते दरवर्षी करत असतात त्यात शाळेच्या व्हरांड्यातील किंवा वर्गातील टाइल्स निघालेली असेल तर ते सुद्धा चांगल्या स्थितीत करत असतात त्यांच्या घराचे प्लास्टर असो किंवा फरशी बसवणे असो श्री रघुनाथ इंगळे स्वतः करतात त्यांच्या या हरहुन्नरीपणाचा परिसरात व गावात कौतुकाचा विषय झालेला आहे.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संतोष पाचपोळ सर जेष्ठ शिक्षक डॉ.शिवचरण उज्जैनकर श्री संतोष ठाकूर सर श्री रोहन आठवले सर शिक्षकेतर श्री रघुनाथ इंगळे श्री विनायक इंगळे व विद्यार्थि मोठ्यात संख्येने उपस्थित होते.

सीमाराणी बागुल यांना साहित्य साधना पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी - जगदीप वनशिव नाशिक - साहित्यकणा फाउंडेशन व भाव सुमन प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील साहित्यिकांना दरवर्षी पुरस्कार दिले जातात. 2025 यावर्षी देण्यात येणाऱ्या साहित्य साधना पुरस्कारासाठी नाशिक येथील रहिवासी उपक्रमशील प्राथमिक शिक्षिका व कवयित्री सीमाराणी बागुल यांना साहित्य साधना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पहिला कवितासंग्रह जीवनाची शाळा याचे प्रकाशन कोपरगाव येथे संपन्न झाला नारायण सुर्वे कवी कट्टा येथे गर्भारलेल्या मातीतून या दुसऱ्या कवितासंग्रहाचे प्रकाशन कवितासंग्रहाचे प्रकाशन झालेले आहे. सीमाराणी बागुल यांच्या साहित्यिक कार्याची दखल गर्भारलेल्या मातीतून या काव्यसंग्रहाला हा पुरस्कार दिला जाणार आहे. नाशिक येथील कॅनडा कॉर्नर येथील समर्थ मंगल कार्यालयात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. अशी माहिती व संजय गोरडे यांनी दिली

कोणताही खेळाडू जीवनात यशस्वी होतो - माजी आ.भीमराव धोंडे

सैराट चित्रपटामुळे माझे आयुष्य बदलले,धोंडे कॉलेजमुळेच मी घडलो – सैराटफेम सुरेश विश्वकर्मा

आष्टी (प्रतिनिधी) व्यायामाला आणि खेळाला जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी आतापासूनच वेगवेगळे खेळ खेळले पाहिजेत. कोणताही खेळाडू जीवनात यशस्वी होतो असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले तर आनंदराव धोंडे महाविद्यालयात मी शिकलो या कॉलेजमुळेच माझे जीवन घडले, मी टीव्हीवरील मालिका आणि चित्रपटात काम करू शकलो ते फक्त धोंडे महाविद्यालयाच्या रंगमंचामुळेच असे मत सिने अभिनेता सुरेश विश्वकर्मा यांनी व्यक्त केले. आष्टी तालुक्यातील कडा येथील बाबाजी संकुलामध्ये माजी आ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १९ ते २१ जुलै अशा तीन दिवसांच्या भव्य क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन सिने अभिनेता सुरेश विश्वकर्मा यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे होते. याप्रसंगी व्यासपीठावर युवा नेते डा. अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे, चित्रपट गीतकार संजय नवगिरे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, चेअरमन राजेश धोंडे, सरपंच भीमराव पाटील, राजाबापु नलावडे,टिव्ही कलाकार सागर पंडागळे, अशोक साळवे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, किशोर खोले, डॉ. किसन गांजुरे, सरपंच दादा जगताप, चेअरमन दादासाहेब हजारे, ह. भ. प. पांडुरंग कर्डीले महाराज, हरिभाऊ जंजिरे, बजरंग कर्डीले, प्राचार्य डॉ. सुर्यकांत धोंडे, विठ्ठल लांडगे, सोनाजी गांजुरे, प्राचार्य भगवान वाघुले, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, गोवर्धन जाधव, शहादेव खेडकर, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे, सागर वाघुले, संदीप ननवरे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. अशोक गदादे, प्राचार्य डॉ. संजय धोंडे, प्राचार्य दादासाहेब काळे, मुख्याध्यापक संजय कोंथबीरे आदि मान्यवर उपस्थित होते. क्रिडा महोत्सवाच्या निमित्ताने प्रारंभी कडा शहरातून ३ हजार ७०० खेळाडूंची भव्य अशी रॅली काढण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी क्रीडा स्पर्धांचे महत्त्व सांगितले. पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की, खेळामध्ये हार जित होतच असते. पराभव झाला तरी कोणी विद्यार्थ्यांनी कमीपणा समजू नये सतत सराव करीत रहा. सराव केल्याने यश निश्चित मिळते. खेळामुळे सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. खेळ खेळणारा माणूस जीवनात निश्चित यशस्वी होतो. सिने

अभिनेता व सैराट फेम सुरेश विश्वकर्मा यांनी सांगितले की, मी या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आहे याचा मला खूप अभिमान आहे. आज ज्या स्टेजवरून मी बोलतोय या स्टेजवर मी घडलो. याच ठिकाणी नाटक, एकांकिका केल्या. अभिनय शिकलो आणि मी विद्यापीठ पातळीवर पोहोचलो. त्यामुळेच माझे भविष्य उज्वल झाले आज याच रंगमंचामुळे मी टीव्ही मालिका आणि चित्रपटांमध्ये काम करीत आहे. खेळाडूंनी खूप प्रॅक्टिस करून खेळ खेळावे, मोठे व्हावे यश संपादन करावे आणि आपल्या आई वडिलांचे आणि शाळेचे नावलौकिक करावे. जीवनात शरीर संपत्ती ही महत्त्वाची आहे, त्यामुळे खेळाला महत्त्व द्या. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर खेळाला महत्त्व आहेच. सैराट चित्रपटांमुळे माझे आयुष्य बदलले. त्या चित्रपटामुळेच मी घराघरात आणि लोकांच्या मनामनात पोहोचलो. यावेळी विश्वकर्मा यांनी सैराट चित्रपटातील संवाद ऐकून विद्यार्थ्यांना प्रचंड खुष केले. गीतकार संजय नवगिरे व इतरांची भाषणे झाली. यावेळी शेतकरीयन या वार्षिक अंकाचे मान्यवरांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी पाहुण्यांचा परिचय संभाजी ओव्हाळ यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. बापु खैरे व प्रा. शैलजा कुचेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ. भास्कर चव्हाण यांनी मानले

स्थानिक स्वराज्य संस्थावर शिवसेनेचा भगवा फडकवणारचं शिवसेना पक्षाच्या बैठकीत केला निर्धार

केज/प्रतिनिधी उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे आणि खासदार श्रीकांतजी शिंदे यांच्या आदेशाने, अर्जुनजी खोतकर (उपनेते) व संजयजी मोरे (सचिव) यांच्या सूचनेवरून संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेच्या रणनिती ची,ताकदीची आणि संघटनेची परीक्षा पाहणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका येत आहेत. या पार्श्वभूमीवर विधानसभा निहाय शिवसेनेची महत्त्वपूर्ण बैठक माधवबाग केज येथे पार पडली. स्थानिक स्वराज्य संस्थे साठी पक्ष,संघटना कशाप्रकारे आणखी बळकट करण्यात येईल याविषयी या बैठकीत चर्चा झाली. अचूक नियोजन व त्याची योग्य अंमलबजावणी केल्याने निवडणुकीत आपण यशस्वी होऊ शकतो. निवडणुकीच्या या आव्हानासाठी आपण सर्वजण तयार आहोत त्यामुळे ङ्कआता थांबायचं नायफ कारण यंदा स्थानिक स्वराज्य संस्थां वर शिवसेनेचा भगवा फडकवण्याचा निर्धार उपस्थित असलेल्या सर्वांनी व्यक्त केला. बापूसाहेब मोरे संपर्कप्रमुख,अनिल दादा जगताप जिल्हा प्रमुखशिवसेना,सचिन भैय्या मुळुक जिल्हा प्रमुख शिवसेना,योगेश नवले जिल्हा संघटक, बालाजी खैरमोडे जिल्हा समन्वयक बांधकाम कामगार सेना,सुजित शिंदे जिल्हाप्रमुख युवासेना,राजाभाऊ लोमटे उप जिल्हाप्रमुख,रवी मुडे गावकर जिल्हा प्रमुख बांधकाम कामगार सेना, दादासाहेब ससाणे शिवसेना विधानसभा प्रमुख केज,अर्जुन वाघमारे तालुकाप्रमुख अंबाजोगाई,अभिमान बापू पटाईत ज्येष्ठ नेते,मालोजी नाना गलांडे पाटील ज्येष्ठ नेते, विकास काशीद केज तालुका सचिव,महेंद्र चाटे उपतालुकाप्रमुख, दत्ता काकडे विभाग प्रमुख,चंद्रकांत इंगळे उपतालुकाप्रमुख, कैलास उगलमुगले उपतालुकाप्रमुख, दादासाहेब पटाईत उपतालुकाप्रमुख, अजित गोरे सरपंच बनसारोळा,विलासराव चोपणे,सुनील पटाईत, अरुण करपे विभाग प्रमुख,गणेश जाधव शहरप्रमुख अंबाजोगाई, गणेश देवकते उप तालुकाप्रमुख अंबाजा ेगाइ ं ,समीरण मसलवार,युवासेना तालुकाप्रमुख अंबाजोगाई,दशरथ चाट े उपत ाल ुक ा प्रम ुख अंबाजोगाई,महादेव चाटे तालुका संघटक अंबाजोगाई,मीराताई आडे उपजिल्हाप्रमुख महिला आघाडी, सुनीताताई जाधव तालुकाप्रमुख अंबाजोगाई महिला आघाडी,तनुजा मुंडे शहर प्रमुख महिला आघाडी अंबाजोगाई,वैजनाथ गायकवाड, ज्ञानेश्वर भांगे,प्रताप वैरागे,अक्षय बसवर, आकाश काकडे,मनोहर गोरे,ओमकेश नेहरकर, सुशील रोकड े,सतीश ससाणे,महेश ससाणे, जगन्नाथ ससाणे शाखा प्रमुख विठ्ठल झाडे आदी कार्यकर्ते शिव

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २० जुले २०२५
https://lokaarambh.com

धर्मांतर केलेल्यांचे अनुसूचित जातींचे प्रमाणपत्र रद्द होणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधान परिषदेत घोषणा



मुंबई : धर्मांतर करून अनुसूचित जातीचे लाभ मिळवणाऱ्यांचे जात प्रमाणपत्र रद्द करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. विधान परिषद सदस्य अमित गोरखे, चित्रा वाघ, प्रवीण दरेकर, उमा खापरे आणि श्रीकांत भारतीय यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्याला उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले, अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा लाभ केवळ हिंदू, बौद्ध आणि शीख धर्मीयांनाच मिळू शकतो, अन्य धर्मीय पात्र नाहीत, असा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने 26 नोव्हेंबर 2024 रोजी दिला आहे. या अनुषंगाने धर्मांतर करून घेतलेले अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र रद्द होणार आहे. ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्यांना अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देणे घटनेला धरून नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातही नमूद आहे की, कोणी जर हिंदू, शीख किंवा बौद्ध नसल्यास, त्यांना अनुसूचित जातीचा दर्जा मिळणार नाही. जर इतर धर्मीयांनी चुकीच्या पद्धतीने अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र मिळवले असेल, तर अशा प्रकरणात संबंधितांचे प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल. या प्रमाणपत्राच्या आधारावर नोकरी, निवडणूक यांसारखे फायदे मिळवले असतील, तर मिळविलेल्या लाभांची वसुलीही केली जाईल. फसवणूक, दबाव किंवा आमिष दाखवून धर्मांतर घडवून आणणाऱ्या घटकांवर कठोर कारवाई केली जाईल. यासंदर्भात राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल प्राप्त झालेला असून, त्याआधारे कायदेशीर तरतुदी करण्यात येतील. कोणत्याही धर्माच्या संस्थेवर केवळ धर्माच्या आधारावर कारवाई केली जाणार नाही. मात्र तक्रारी आल्यास चौकशी करून दोषी आढळल्यास कारवाई केली जाईल. क्रिष्टो ख्रिश्चन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकांकडून गुप्तपणे धर्मांतरण करून हिंदू म्हणून दाखवून घेतलेली सर्टिफिकेट्स हेही आव्हान बनत आहे. स्पॉट व्हिजिट व तक्रारींच्या आधारे अशा प्रकरणांची सत्यता पडताळून वैधता रद्द करण्याचे अधिकार अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. स्वेच्छेने धर्म बदलण्यावर कोणतीही बंदी नसली तरी, फसवणूक करून धर्मांतर केल्यास त्याविरोधात राज्य शासन कठोर पावले उचलेल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या गुणगौरव सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - मारुती पठाडे

स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्या. कडा, ता. आष्टी, जि. बीड अंतर्गत सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव समारंभ (सन २०२४ - २५) रविवार दि. २० जुलै २०२५ सकाळी ११ वा. मोरेश्वर मंगल कार्यालय, गणपती चौक, लिमटाका आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे आयोजित केलेला आहे. गुणगौरव समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीम. वैशालीताई पाटील (तहसीलदार आष्टी) ह्या असणार आहेत तर प्रमुख व्याख्याते म्हणून संतोषजी खाडे साहेब (पोलीस उप अधिक्षक अहिल्यानगर) हे उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी प्रमुख उपस्थिती श्रीम. सिमा काळे (गटशिक्षणाधिकारी पं. स. आष्टी), मनोरंजनजी धस साहेब (शिक्षणविस्तार अधिकारी जि. प. बीड), मोहनराव काकडे (शिक्षणविस्तार अधिकारी पं. स. आष्टी) व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी या गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यास पतसंस्थेच्या सभासदांनी मोठ्या संख्येने आपल्या गुणवंत पाल्यांसह उपस्थित रहावे असे आवाहन स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेश शिंदे, संचालक आप्पासाहेब काळे, चंद्रशेखर खाडे, प्रविण

मेहेरकर, आजिनाथ गर्जे, पोपट बोराडे, नितीन करडुळे, रत्नाकर चव्हाण, स्वानंद थोरवे, हिरामण पोकळे, विठ्ठल शिंदे, संजय काळे, गोरक्ष गोरे, श्रीम. शैला सातपुते - पोकळे, श्रीम. मनिषा होळकर - उढाणे, कार्यतत्पर व्यवस्थापक ज्योतीराम देसाई, संगणक तज्ञ वैजनाथ रायते यांनी केले आह

केज शहरातील विज वितरण कंपनीची साठी टक्के वसुली पूर्ण

केज/प्रतिनिधी केज शहरातील अर्बन विज वितरण कंपनीने साठ टक्के विज बिल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण केले असल्याची माहिती केज येथील उप कार्यकारी अभियंता एम.जी.सय्यद यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.विज वितरण कंपनीची एकुण थकबाकी १ कोटी २८ लाख रुपये आहे.त्यापैकी ७५ लाख रुपये वसूल करण्यात आले असून ३४१ लाख रुपये थकबाकी असल्याचे त्यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. केज शहरात विजबिल वसुली मोहीम राबविण्यात येत आहे. विज वितरण कंपनीचे कर्मचारी प्रत्यक्ष ग्राहक यांच्या भेटी घेऊन विज बिल भरण्याचे आवाहन करत असुन थकबाकी दार ग्राहक विज बील भरण्यासाठी चांगला प्रतिसाद देत आहेत. त्यामुळे विज बिल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विज ग्राहक सहकार्य करताना दिसत आहेत. विज बिलाची रक्कम रोख स्वरूपात स्विकारत आहेत त्यामुळे त्यामुळे ग्राहकांना विना अडथळा बिल भरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.या बद्दल ग्राहक समाधान व्यक्त करताना दिसत आहेत.यावेळी विज वितरण कंपनीचे उप कार्यकारी अभियंता एम.जी.सय्यद,विज वितरण सहाय्यक विष्णु तेलंग यांच्या सह विज वितरण कंपनीचे कर्मचारी विज बिल वसुलीचे काम करत आहेत.

जालना - लोकसभा लोकप्रिय खासदार डॉ.कल्याण काळे साहेब यांच्या वाढदिवसानिमत्त बदनापूर नगरपंचायत समोर शहराध्यक्ष जावेद बागवान यांच्या कडुन खासदार साहेबांचा फटाकेच्या आतीष बाजी करीत व ढोल ताशेच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष अन्वर भाई, नगरसेवक पांडुरंग जऱ्हाड राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट ,काँग्रेस शहराध्यक्ष शेख जावेद बागवान, काँग्रेसचे माजी नगरसेवक जावेद कुरेशी, ता.उपाध्यक्ष शेख युनुस भैय्या, युवक शहर अध्यक्ष शेख नईम (राजु), हाजी आसेफ भाई, सतीश भैया साबळे ,सय्यद अज़हर नेता, अ.जा.ता.अध्यक्ष विलास साबळे, भाई,शेख अलीम, शेख वसिम, सुनील दाभाडे उपस्थित होते.

परभणी महापालिकेच्या मसावलीफनिवारा केंद्रातून बेघरांना आधार; रस्त्यावरील नागरिकांसाठी समुपदेशन मोहीम राबवली

परभणी : परभणी शहरात बेघर, निराधार व रस्त्यावर झोपणाऱ्या व्यक्तींना सुरक्षित आसरा आणि मानवी सन्मान मिळावा यासाठी परभणी महानगरपालिका ङ्गसावली वृद्धाश्रमम या नावाने निवारा केंद्र यशस्वीपणे चालवत आहे. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (छणडच्) अंतर्गत सुरू असलेले हे केंद्र सध्या २३ नागरिकांना निवारा पुरवत आहे, यामध्ये १८ पुरुष व ५ महिला निवास करत आहेत. निवारा केंद्रात निवास, भोजन, स्वच्छता, नियमित आरोग्य तपासणी यांसारख्या सर्व मूलभूत सुविधांची मोफत उपलब्धता आहे. तसेच येथे दाखल झालेल्या व्यक्तींशी नियमित संवाद साधून त्यांचं मानसिक आणि

सामाजिक पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला जातो. या उपक्रमाला आणखी प्रभावी करण्यासाठी दिनांक १९ जुलै २०२५ रोजी, महापालिकेच्या छणडच् विभाग व निवारा केंद्र पथकामार्फत शहरातील बस स्थानक, रेल्वे स्टेशन, रुग्णालय परिसर, सरकारी कार्यालय परिसर व दर्गा भाग याठिकाणी प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या. रस्त्यावर राहणाऱ्या व्यक्तींशी थेट संवाद : यावेळी सुभाष मस्के, यक्याऱ्यर पठाण, शेख मोहम्मद, आशा सोनवणे, कुशावर्ती जंगले, नागसेन कांबळे, अजुन झटे, रेखा तपासे (NULM² विभाग) आणि सावली प्रतिष्ठानचे युवराज गव्हाणे यांनी रस्त्यावर वास्तव्यास असलेल्या नागरिकांशी थेट संवाद साधला. त्यांना निवारा केंद्रातील उपलब्ध सोयी-सुविधांची माहिती देण्यात आली तसेच त्यांची स्वतःच्या इच्छेने निवारा केंद्रात राहण्यास सहमती मिळवण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे शहरातील एकही व्यक्ती उघड्यावर राहू नये, त्यांना मूलभूत गरजा व सन्मानपूर्वक जीवनाची संधी मिळावी हा आहे.महानगरपालिकेचे आयुक्त धैर्यशील जाधव हे वेळोवेळी या संपूर्ण प्रक्रियेचा आढावा घेत असून, निवारा केंद्रातील सोयीसुविधांची खातरजमा करून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करीत आहेत. महापालिकेच्या या संवेदनशील उपक्रमामुळे परभणी शहरात मानवी सहानुभूती आणि सामाजिक बांधिलकीचे सकारात्मक उदाहरण निर्माण झाले आहे. यामुळे अनेक बेघरांना नवजीवनाची आशा निर्माण झाली असून, त्यांचे जीवन अधिक सन्मानाने जगता येते आहे.

रोपवाडीचे माजी सरपंच विष्णू रोप यांची अंबाजोगाई भाजपा तालुका उपाध्यक्षपदी निवड

अंबाजोगाई ।प्रतिनिधी शेपवाडीचे माजी सरपंच आणि अंबाजोगाई शहरातील एक प्रतिष्ठित मोठे व्यापारी असलेल्या विष्णुपंत शेप यांची अंबाजोगाई भाजपा तालुका उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.अंबाजोगाई शहरातील मोंढा मार्केट मधील स्टीलचे सर्वात मोठे व्यापारी व टाटा स्टीलचे डीलर तालुक्यातील शेपवाडी सारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि मोठ्या ग्रामपंचायतीचे तीन वेळा सरपंच राहिलेले, शहरातील भगवानबाबा चौकापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या भव्यदिव्य अशा ड्रीम सिटी तथा सटवाजीनगरचे मालक, शेपवाडी-अंबाजोगाईसह पंचक्रोशीतील अतिशय लोकप्रिय व्यक्तिमत्व असणारे सर्वांचे लाडके तात्या राजकारणात आल्यापासून आजतागायत मुंदडा कुटुंबाचे अगदी एकनिष्ठ तथा अत्यंत निकटवर्तीय कार्यकर्ते म्हणून ओळख असणारे विष्णुपंत उमाजी शेप यांची नुकत्याच नव्याने निवड झालेल्या भारतीय जनता पार्टीच्या कार्यकारणीमध्ये तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल मंत्री पंकजा मुंडे, माजी खा.डॉ. प्रीतम मुंडे, आ.नमिता मुंदडा, भाजपा ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते तथा चेअरमन पनगेश्वर कारखाना, भाजपा राज्य कार्यकारिणी सदस्य अक्षय मुंदडा, बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष संतोष भगत, मोरेवाडी जि.प.सदस्य बालासाहेब शेप, अखंड हिंदूराष्ट्र संघटनेचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष तथा भाजपा ग्रामविकास-पंचायतराज विभागाचे मराठवाडा संयोजक आणि नरेंद्र मोदी विचारमंचाचे बीड जिल्हाध्यक्ष पत्रकार सुनील सिरसाट, घड्इङ बिल्डर ग्रुप, गोवा येथील प्रसिद्ध बील्डर डी.के. पाटील, शेपवाडी ग्रामपंचायतीत १३ पैकी तब्बल निवडून आलेले ९ ग्रामपंचायत सदस्यांसह शहरातील अनेक प्रतिष्ठित पुढारी व्यापारी व इतरही स्तरातील मान्यवरांनी झालेले या निवडीबद्दल विष्णुपंत शेप यांचे अभिनंदन केले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com